MHSN040002402022

दाखल दिनांक	१०/०३/२०२२
नोंदणी दिनांक	१४/०३/२०२२
निर्णय दिनांक	०२/०४/२०२६
कालावधी – ०४ व. ०० म. २३ दि.	

<u>मोटार अपघात दावा न्यायाधीकरण, इस्लामपूर यांचे न्यायालयात,</u>

(सदस्य श्रीमती. ए. एच. काशीकर,)

<u>मोटार अपघात दावा क्र.१२/२०२२</u>

निशाणी क्रमांकः—

श्री. नारायण विष्णू नांगरे,
वय—५७ वर्षे, व्यवसाय — शेती.
रा. कुरुंगली, ता.शिराळा,
जि. सांगली. .. **अर्जदार**

विरुध्द

१. श्री. मनोज केशव कांबळे,
वय–३६ वर्षे, धंदा– शेती (वाहन मालक), ..**जाबदार**

२.	श्री. विनोद केशव कांबळे,
वय–३६ वर्षे, धंदा– शेती (वाहन मालक),
दोघे रा. सिध्दार्थ नगर, आरळा,
ता.शिराळा, जि.सांगली.	..**जाबदार**

अर्जदार तर्फे विधीज्ञ – श्री. पी.एस.पवार
जाबदार नं.१ व २ तर्फे विधीज्ञ – श्री. आर. बी.पाटील

अर्ज	:	मोटार वाहन कायदा कलम १६६ प्रमाणे अपघात
नुकसान भरपाई रु.८,००,०००/– मिळणेसाठी.

न्यायनिर्णय
(दिनांक ०२/०४/२०२६)

अर्जदाराने कलम १६६ मोटार वाहन अपघात कायद्यान्वये रक्कम रु.८,०००/– (अक्षरी आठ लाख मात्र) नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

या प्रकरणाची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे –

२.	अर्जदार शेतमजूर असून प्रस्तुतच्या अपघाताची घटना दिनांक २० फेब्रुवारी २०२१ रोजी घडली. सदर दिवशी सकाळी १०.०० वाजता अर्जदार त्याच्या भावाला भेटण्याकरिता करुंगली गावी एस.टी. बसने आले होते व भावास भेटून आरळा गावी बाजारातून भाजीपाला आणण्याकरिता करुंगळी गावातून चालत आरळ्यास गेले होते. आरळा मेन रोडवरील एन.डी.लोहार यांच्या वेल्डिंग वर्कशॉप समोर चालत असताना पाठीमागून काळ्य रंगाच्या हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल क्रमांक एम.एच.१०–डी.बी.३२४० या वाहनाने त्यांना पाठीमागून

धडक देऊन गंभीररित्या जखमी केले व त्यामुळे अर्जदार यास इस्लामपूर येथील आधार हेल्थ केअर हॉस्पिटल येथे उपचाराकरिता भरती करण्यात आले.

३. सदरच्या अपघातात अर्जदाराची कुठलीही चूक नव्हती. सदर वादातीत वाहन जाबदार क्रमांक २ चालवत होता व हे वाहन जाबदार क्रमांक १ च्या मालकीचे होते. जाबदार क्रमांक २ ने भरधाव वेगात निष्काळजीपणे वाहतुकीच्या नियमांचे पालन न करता वाहन चुकीच्या बाजूने चालवल्यामुळेच सदर अपघात घडला व त्यात अर्जदाराच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याला दवाखान्यात मोठा काळ भरती राहावे लागले. त्या दरम्यान डोक्यावर शस्त्रक्रिया होऊन कवटीचा भाग पोटात शस्त्रक्रिया करून ठेवण्यात आला आहे व तो पुन्हा कवटीला जोडावा लागणार आहे. त्याकरिता भविष्यातही शस्त्रक्रिया कराव्या लागणार आहेत.

४. अर्जदारने या दुखापतीवर आवश्यक उपचार घेऊनही त्याला कायमचे शारीरिक अपंगत्व आलेले आहे व त्याला कामाकरिता इतरांची मदत घ्यावी लागते. या गंभीर दुखापतीमुळे त्याला पूर्वीसारखे मजुरीचे काम करता येत नाही. त्याचे वय अपघाताच्या वेळी ५७ वर्षे होते व तो मजुरी तसेच जनावरांचा सांभाळ व दुग्ध व्यवसाय करून दरमहा उत्पन्न मिळवत होता. या अपघातामुळे त्याचे उत्पन्न बंद झालेले आहे. त्याचे कुटुंब त्याच्यावर अवलंबून आहे. जाबदार क्रमांक १ हा वादातीत वाहनाचा मालक तर जाबदार क्रमांक २ हा त्या वाहनाचा चालक आहे. त्यामुळे अर्जदाराला नुकसान भरपाई देण्याची त्यांची वैयक्तिक व संयुक्तिक जबाबदारी आहे. म्हणून अर्जदाराने भवितव्यातील बुडालेले उत्पन्न, वैद्यकीय उपचाराचा खर्च व इतर खर्च यासह एकूण ८ लाख रुपये इतकी नुकसान भरपाईची मागणी जाबदारांकडून केलेली आहे.

५. जाबदार क्रमांक १ व २ यांनी न्यायालयात हजर राहून निशाणी १० वर कैफियत सादर केली. सदर कैफियतीमधील संक्षिप्त कथन पुढील प्रमाणे–

जाबदार क्रमांक २ यांनी वादातीत वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालवल्याची बाब जाबदारांनी अमान्य केलेली आहे व इतर सर्व कथने अमान्य केली आहेत. त्यांच्या कथनानुसार अर्जदार यांना दारूचे व्यसन असून घटनेच्यावेळी ते दारू पिऊन स्वतः रस्त्यावर पडले व जखमी झाले. त्यांच्या जखमी होण्याचा जाबदारांशी दुरान्वयेही संबंध नाही. अर्जदाराने नमूद केलेले परावलंबत्व तसेच वयाचा व गरजेचा तपशीलही जाबदारांनी अमान्य केलेला आहे व ते कथित घटनेत अपघातासाठी जबाबदार नसल्याने नुकसान भरपाई देण्यास जबाबदार नाहीत म्हणून अर्ज रद्द करण्यात यावा असे कथन जाबदारांनी केलेले आहे.

६. उभय पक्षाची कथने व पुरावा यावरुन मुद्दे निशाणी १२ वर निश्चित करण्यात आले. सदर मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहेत.

क्र.	**मुद्दे**	**निष्कर्ष**
१	अर्जदाराने हे सिध्द केले आहे काय की, दिनांक २०/०२/२०२१ रोजी सायंकाळी ५.३० वाजणेचे सुमारास आराळा गावी मेन रोडवर जाबदार क्र.२ यांनी त्यांच्या ताब्यातील हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल क्रमांक एम.एच.१०–डी.बी.३२४० ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून	.. होय.

	अर्जदारास धडक देऊन अपघात केला व सदर अपघातात तो जखमी झाला ?	
२	जाबदार यांनी हे सिध्द केले आहे काय की, अर्जदार व्यसनी असून दारुच्या नशेत रस्त्यावर पडला व तो स्वतःच सदर अपघातास संपुर्णपणे जबाबदार आहे?	.. नाही.
३	अर्जदार नुकसानभरपाई मिळण्यास पात्र आहे काय? असल्यास, किती व कोणाकडून ?	होय. अंतीम आदेशाप्रमाणे
४	अर्जदार व्याज मिळण्यास पात्र आहे काय ? असल्यास, किती ?	होय. द.सा.द.शे. ६ टक्के दराने.
५	हुकुमनामा काय ?	अंतिम आदेशाप्रमाणे.

<u>कारणमीमांसा</u>

<u>मुद्दा क्र. १ व २ करिताः</u> –

७. मोटर वाहन कायदा हा सार्वजनिक रस्त्यावरील वाहतुकीच्या नियमासंबंधी कायदा असून त्यात वेगवेगळी वाहने, त्यांचे परवाने, वाहन चालविण्याचे नियम व अटीचा भंग झाल्यास शिक्षेच्या तरतुदी अशा सर्व बाबी समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. सदर कायदयाच्या कलम १४० पासून १७६ पर्यंतची कलमे मोटर अपघात प्राधिकरण, वाहन चालविण्याचे नियम, नुकसान भरपाईचे नियम, वाहन चालकाच्या सदोष वाहन चालविणेबाबतची

नुकसान भरपाई व विना दोष वाहन चालविणेबाबतची नुकसान भरपाई व विमा वगैरे बाबत तरतुदी सांगतात. प्रस्तुत प्रकरण मोटर वाहन कायदयाच्या कलम १६६ खाली दाखल करण्यात आले आहे. यातील नुकसान भरपाई ही वाहन चालकाच्या दुर्लक्ष व हयगयीच्या वाहन चालनावर निर्धारित असते. समोरच्या वाहनाच्या चालकाचा निष्काळजीपणा, बेदरकारपणा व हयगय सिध्द केल्याशिवाय ही नुकसान भरपाई जखमी वा मयत इसमाच्या कायदेशीर आश्रीतांना मिळु शकत नाही. तसेच जखमी अर्जदाराने कायमचे अपंगत्व सिध्द केल्याशिवाय त्याला भविष्यातील नुकसानाबाबतची नुकसान भरपाई देखील मिळु शकत नाही.

८. निश्चीतच प्रस्तुत कायदा जखमी, तसेच मयतावर अवलंबुन असलेल्या लोकांसाठी कल्याणकारी व समाजिक कायदा म्हणून तयार करण्यात आला आहे. समाजकल्याण हेच या कायदयाचे उद्दीष्ट आहे व त्या अनुशंगाने पुरावा अधिनियमांतील नियम शिथिल करुन नुकसान भरपाई दिली जावू शकते. मात्र अर्जदाराला शाबितीकरणाच्या जबाबदारीतुन पुर्णपणे सुट दिली जावू शकत नाही.

९. अर्जदारने वादातीत अपघातासंदर्भात निशाणी १४ वर स्वतःचा शपथपत्रावरील पुरावा सादर केलेला आहे व या अपघाताला जाबदार क्रमांक २ याचे हलगर्जीपणाचे व निष्काळजीपणाचे वाहन चालन कारणीभूत होते असे कथन केले आहे. सदर साक्षीदाराने मूळ अर्जाप्रमाणेच अपघात व नुकसान भरपाई संदर्भात या पुराव्यात सविस्तर कथन केले आहे. तसेच निशाणी २३ वर जाबदार क्रमांक २ च्या विरुद्ध कलम २७९, ३३७, ३३८, ४२७ भा.द.वी. व कलम १८४, १८५, १३४ व कलम १९९ मोटर वाहन कायद्याप्रमाणे दाखल झालेल्या

दोषारोपपत्राची प्रमाणित प्रत दाखल केलेली आहे. या दोषारोपपत्रामध्ये रंजना नांगरे यांनी दिलेली गुन्ह्याची पहिली खबर, वर्दी जबाब, घटनास्थळ पंचनामा, इतर साक्षीदारांचे जबाब, डॉक्टर योगेश वाठारकर यांनी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र व वादातीत मोटर वाहन हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल क्रमांक एम.एच.१०–डी.बी.३२४० चे आरसी बुक अशी अनेक कागदपत्रे दाखल केलेली आहेत. या सर्व कागदपत्रांवरून प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अर्जदार घटनेच्या वेळी पायी जात असताना वादातीत वाहनाने मागून येऊन त्याला धडक दिली. सदरचे निष्काळजी वाहन चालवण्याचे दोषारोपण केवळ जाबदार क्रमांक २ च्या विरुद्धच करण्यात आलेले आहे. जाबदार क्रमांक २ यांनी न्यायालयात हजर राहूनही अर्जदाराची उलटतपासणी घेतलेली नाही. तसेच जाबदार क्रमांक १ ने ही अर्जदाराची उलटतपासणी घेतलेली नाही. तसेच तो या वादातीत वाहनाचा मालक असल्याची बाब नाकारलेली नाही. त्यामुळे अर्जदारने दाखल केलेला तोंडीपुरावा विना आव्हान राहिला असे निदर्शनास येते. शिवाय या तोंडी पुराव्यानुसार अर्जदारने दोषारोप पत्रातील कागदपत्रांद्वारे लेखी परिपुष्टी दिलेली आहे व त्यामुळेच अर्जदाराचा त्याच्या अपघातासंबंधीचा व जाबदार क्रमांक २ ने हलगर्जीपणाने व निष्काळजीपणाने वाहन चालवून केल्याबाबतचे कथन खरे व विश्वासार्ह आहे असे अनुमान मी काढले. जाबदार क्रमांक १ व २ यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये असा बचाव मांडला की अर्जदारास दारूचे व्यसन असल्यामुळे तो स्वतः दारू पिऊन रस्त्यावर पडला व त्याला दुखापत झाली मात्र कैफियतीमधील या कथनाला परिपुष्टी देण्यासाठी जाबदाराने कुठलाही स्वतंत्र पुरावा सादर केला नाही. तसेच अर्जदाराची उलटतपासणीही घेतली नाही. वादातीत घटनेच्या दिवशी वादातीत अपघात घडला व अर्जदारला गंभीर दुखापती झाल्या, ही बाब संपूर्ण प्रकरणात कोठेही खंडित झालेली नाही.

अर्थातच अर्जदाराने त्याला कायमचे अपंगत्व आले असे कथन केले असले तरी अपंगत्वाचा दाखला सादर केला नाही व त्या संदर्भातील वैद्यकीय अधिकारीही तपासले नाही. त्यामुळे अर्जदाराला कायमचे अपंगत्व आले, ही बाब सिद्ध झाली नाही असे अनुमान मी काढले.

१०. मात्र अर्जदाराला कायमचे अपंगत्व आले नसले तरी त्याला गंभीर दुखापत झाली असल्याबाबत व डोक्यालाही दुखापत झाली असल्याबाबत अर्जदाराने वैद्यकीय अधिकारी डॉ. योगेश रंगराव वाठारकर यांची साक्ष साक्षीदार क्रमांक २ म्हणून निशाणी ३० वर नोंदवली आहे. त्यांच्या पुराव्यानुसार अर्जदाराला दिनांक २१ फेब्रुवारी २०२१ रोजी त्यांच्या आधार हॉस्पिटल मध्ये भरती करण्यात आले होते व सदर अर्जदारच्या डोक्यास Subdural haematoma व Extradural haematoma अशा दुखापती झाल्याचे निदान त्यांनी केले होते. सदर साक्षीदाराने निशाणी ३ वरील वैद्यकीय बिले त्यांच्याच दवाखान्यातून देण्यात आले असे सांगून त्या संगणकीकृत पुराव्याबाबत पुरावा अधिनियमाच्या कलम ६५ ब अंतर्गतचे प्रमाणपत्र निशाणी ३१ प्रमाणे सादर केले व त्यामुळे वैद्यकीय बिलांना एकत्रितरित्या निशाणी ३२ व ३३ देण्यात आली. या सर्व वैद्यकीय पुराव्याचे अवलोकन करून मी या निष्कर्षाप्रत पोहोचले की, अर्जदारला वादातीत घटनेत दुखापत पोहोचवण्याच्या बाबीला साक्षीदार क्रमांक २ ने परिपुष्टी दिली आहे व त्यामुळे दोन्ही साक्षीदारांचा पुरावा विश्वासार्ह आहे. या विश्वासार्ह पुराव्यांच्या आधारे मी या निष्कर्षाप्रत पोहोचले की, दिनांक २० फेब्रुवारी २०२१ रोजी अर्जदाराचा अपघात जाबदार क्रमांक १ च्या मालकीच्या व जाबदार क्रमांक २ चालवत असलेल्या हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल क्रमांक एम.एच.१०–डी.बी.३२४० या वाहनाने झाला असून

सदरचा अपघात जाबदार क्रमांक २ च्या निष्काळजी वाहन चालवण्याने झाला व त्यामुळे अर्जदारला गंभीर दुखापत झाली म्हणून मुद्दा क्रमांक १ चे उत्तर मी 'होय' असे दिले. तर जाबदारांनी अर्जदार दारू पिऊन स्वतः रस्त्यावर पडल्याने त्याला दुखापत झाल्याची बाब सिद्ध न केल्याने मुद्दा क्रमांक २ चे उत्तर मी 'नाही' असे दिले.

<u>मुद्दे क्रमांक ३ व ४ करिताः-</u>

११. मुद्दे क्रमांक १ व २ च्या निष्कर्षावरून ही बाब सिद्ध होते की, वादातीत अपघात जाबदार क्रमांक २ च्या चुकीने झाला असून त्यामुळे अर्जदारला गंभीर दुखापत झाली. जाबदार क्रमांक १ या वाहनाचा मालक आहे तर जाबदार क्रमांक २ चालक आहे, त्यामुळे निश्चितच अर्जदार या दोघांकडून संयुक्तिक व वैयक्तिकरित्या नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे. अर्जदारने त्याच्या पुराव्यात असे नमूद केले की, त्याला कायमचे अपंगत्व आल्यामुळे त्याचे उत्पन्न बंद झाले आहे. परंतु याबाबतचा कुठलाही पुरावा अर्जदारने सादर केलेला नाही. मात्र निश्चितच त्याच्या डोक्यावर झालेल्या गंभीर स्वरूपाच्या दुखापतीचा विचार करता त्याचे उत्पन्न साधारणतः तीन महिने या कालावधीकरिता बंद झाले असेल, असे अनुमान मी काढले. अर्जदारने त्याच्या मासिक उत्पन्नाबाबत कुठलाही लेखी पुरावा सादर केलेला नाही व त्याचे मासिक उत्पन्न किती आहे हेही पुराव्यात नमूद केलेले नाही. अर्जदाराचे वय ५७ वर्षे असून त्याची परिस्थिती सुदृढ आहे व त्याच्या कुटुंबात आर्थिक जबाबदारी घेणारी कुठलीही इतर व्यक्ती नाही या परिस्थितीचा विचार करून सद्यस्थितीला अनुरूप असे अर्जदारला साधारणपणे १५,०००/- रुपये इतके मासिक उत्पन्न मिळते असे अनुमान मी काढले व त्यामुळे तीन महिन्यांच्या उत्पन्नाचे नुकसान एकूण

४५,०००/– रुपये होईल, असे अनुमान मी काढले. अर्जदारने निशाणी ३२ व ३३ वर वेगवेगळी वैद्यकीय बिले सादर केली असून त्याची एकूण रक्कम रुपये २,५०,३९९/– इतकी होते. त्यामुळे अर्जदार सदर रक्कम मिळण्यास पात्र आहे असे अनुमान मी काढले. या अपघातामुळे अर्जदारला यापुढेही काही शस्त्रक्रिया कराव्या लागणार आहेत, असे अर्जदारच्या पुराव्यातून सिद्ध झालेले आहे. त्याची कवटी शस्त्रक्रिया करून पोटात ठेवण्यात आल्याबाबत अर्जदारने पुरावा दिलेला आहे. अशा शस्त्रक्रियेस निश्चितच बराच खर्च लागणार असल्याने, मात्र त्याबाबत वैद्यकीय पुरावा सादर न केल्याने हा खर्च साधारणपणे १,५०,०००/– रुपये इतका होईल असे अनुमान मी काढले व म्हणून भविष्यातील वैद्यकीय उपचारासाठी १,५०,०००/– रुपये नुकसान भरपाई योग्य होईल, असा निष्कर्ष मी काढला. अर्जदारास या अपघातामुळे दैनंदिन परिस्थिती आणण्याकरिता आर्थिक सबळता देणेही महत्त्वाचे आहे व निश्चितच त्याने या अपघातामुळे शारिरीक व मानसिक त्रास सहन केलेला आहे त्याकरिता ५०,०००/–रुपये रक्कम देणे योग्य होईल, असे अनुमान मी काढले. तसेच या कालावधी दरम्यान अर्जदारास स्वतःच्या निरोगी आरोग्यासाठी योग्य पौष्टिक आहार घेणे आवश्यक होते व पुढेही राहील म्हणून त्याबाबतचा जो जास्तीचा आर्थिक भार त्याला सोसावा लागला त्याकरिता पौष्टिक आहाराच्या अनुषंगाने ५०,०००/– रुपये इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देणे योग्य होईल असे मला वाटते.

१२. एकंदरीत वर नमुद केल्या विवेचनानुसार अर्जदारास नुकसान भरपाईची रक्कम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येते.

अ.क्र	वर्णन	रक्कम
१	वैद्यकीय बीलांचा खर्च	२,५०,३९९/–
२	वेदना, मानसिक त्रास व दुःखापोटी नुकसानभरपाई	५०,०००/–
३	पुढील उपचाराचा खर्च	१,५०,०००/–
४	विशेष आहाराचा खर्च	५०,०००/–
५	अपघातामध्ये नष्ट झालेल्या कमाईच्या क्षमतेबाबत ३ महिन्यांची सरासरी नुकसान भरपाई (दरमहा रु.१५,०००/– अंदाजाने)	४५,०००/–
	एकूण रक्कम	**५,४५,३९९/–**

१३. वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार हे रक्कम रु.५,४५,३९९/– इतकी नुकसानभरपाई मिळणेस पात्र आहेत असे अंतिम अनुमान मी काढले. सर्वसामान्यपणे अपघात नुकसानभरपाई देण्याची जबाबदारी ही सदर वाहनाचे चालक व मालक व विमा कंपनी यांची वैयक्तीक व संयुक्तीकरित्या असते. प्रस्तुत प्रकरणामध्ये जाबदार क्र.१ हे अपघातातील हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल क्रमांक एम.एच.१०–डी.बी.३२४० चे मालक व जाबदार क्र.२ हे चालक आहेत. सदरील वाहनाचा विमा उतरवलेला नाही. त्यामुळे विमा कंपनी जबाबदार असण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. म्हणुन माझे असे मत आहे की, जाबदार क्र.१ व २ हे वैयक्तीक व संयुक्तीकरित्या अर्जदारास नुकसान भरपाईची रक्कम देण्यास जबाबदार आहेत. तसेच एकंदरीत परिस्थितीचा विचार करता, सदर नुकसान

भरपाईची रक्कम द.सा.द.शे.६% दराने देणे योग्य होईल असेही अनुमान मी काढले. सबब, मुद्दा क्र.३ व ४ चे उत्तर मी त्याप्रमाणे नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

आदेश

१. अर्ज अंशतः खर्चासह मंजूर.

२. जाबदार क्र.१ व २ यांनी वैयक्तीक व संयुक्तीकरित्या अर्जदार यांना नुकसान भरपाईची रक्कम रु.५,४५,३९९/- (अक्षरी रक्कम रुपये पाच लाख पंचेचाळीस हजार तीनशे नव्व्यान्नव मात्र) (ना-दोष दायित्वाची रक्कम मिळून) व त्यावर अर्ज दाखल तारखेपासून पूर्ण रक्कम मिळेपर्यंत द.सा.द.शे.६% व्याज दयावे.

३. जाबदार क्र. १ व २ यांनी सदरची नुकसान भरपाईची रक्कम आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आंत न्यायाधिकरणात खालीलप्रमाणे भरावी :-

Name of Account	-	Member MACT Islampur
Bank Name	-	State Bank of India
Branch	-	Urun Islampur
Account No.	-	40662542602
IFS Code	-	SBIN0000534

४. अर्जदाराने सदर दाव्याची संपूर्ण कोर्ट फी भरलेली नाही. सबब, अर्जदाराने सदर निकालाप्रमाणे १५ दिवसाच्या आंत उर्वरीत कोर्ट फी जमा करावी.

५. वरील रक्कम जमा झाल्यानंतर तसेच कोर्ट फी भरल्यानंतर नुकसानभरपाईची रक्कम व्याजासह अर्जदार यांना धनादेशाद्वारे देण्यात यावी.

६. येणेप्रमाणे हुकुमनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

ACHALA HARSHAVARDHAN KASHIKAR

Digitally signed by ACHALA HARSHAVARDHAN KASHIKAR
Date: 2026.04.06 16:47:25 +0530

(श्रीमती ए. एच. काशीकर)

दिनांक ०२/०४/२०२६

सदस्य, मोटार अपघात दावा
न्यायाधीकरण, इस्लामपूर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original order.

Name of the Stenographer	:	S. W. Pathan, Steno, (Grade-I)
Court Name	:	Adhoc District Judge – 1 & Addl. Sessions Judge, Islampur.
Date	:	02/04/2026
Signed by P.O. on	:	06/04/2026
Uploaded on	:	06/04/2026